निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
रविवार
१८ जानेवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३२४ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## संक्षिप्त

### देशातील पहिले 'मेनोपॉज क्लिनिक' राज्यात सुरू, महिलांच्या आरोग्यासाठी ऐतिहासिक पाऊल : राज्यमंत्री मेघना बोर्डीकर

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** महिलांचे आरोग्य केंद्रस्थानी ठेवत राज्यातील सर्व शासकीय रुग्णालये तसेच शहरी भागांमध्ये 'मेनोपॉज क्लिनिक' सुरू करण्यात आले आहेत. असे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी सांगितले.



आरोग्य राज्यमंत्री बोर्डीकर म्हणाल्या, मेनोपॉज म्हणजे महिलांच्या आयुष्यातील अत्यंत संवेदनशील टप्पा. या काळात होणारे शारीरिक बदल, मानसिक ताण, हॉर्मोन असंतुलन, हाडांचे आजार, झोपेचे विकार व नैराश्य याकडे आजवर दुर्लक्ष होत होते. हीच गरज ओळखून राज्य शासनाने महिलांसाठी 'मेनोपॉज क्लिनिक' सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

आरोग्य राज्यमंत्री बोर्डीकर यांनी सांगितले की, या क्लिनिकच्या माध्यमातून, तज्ज्ञांकडून वैद्यकीय सल्ला, मानसिक आरोग्य समुपदेशन, हाडे, हृदय व हॉर्मोन तपासणी, औषधोपचार व मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येत आहे. देशात प्रथमच अशा प्रकारचे 'मेनोपॉज क्लिनिक' सुरू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे. महिलांच्या आरोग्याबाबत राज्य शासनाने उचललेले हे पाऊल इतर राज्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे.

मेनोपॉज हा आजार नाही, तर महिलांच्या आयुष्यातील एक नैसर्गिक टप्पा आहे. मात्र या टप्प्यात महिलांना शारीरिक आणि मानसिक आधाराची अत्यंत गरज असते. राज्यातील प्रत्येक महिलेला या काळात योग्य सल्ला, उपचार आणि सन्मान मिळावा, यासाठीच मेनोपॉज क्लिनिक सुरू करण्यात आले असल्याचे राज्यमंत्री बोर्डीकर यांनी सांगितले.

### कार्यकर्त्यांची कार पेटवली



निकाल लागल्यानंतर पिंपरीत कार्यकर्त्यांची कार पेटवली, पेटवणारा राजकीय पक्षाचा असल्याचा आरोप, घटना सीसीटीव्हीत कैद.

### सिकलसेल निमियाविरोधात 'अरुणोदय' जनजागृती मोहिम




**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमात 'अरुणोदय' सिकलसेल निमिया विशेष जनजागृती मोहीम' या विषयावर आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड यांची मुलाखत प्रसारित होणार आहे.

'दिलखुलास' कार्यक्रमातील ही मुलाखत दि. १९ ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत दररोज सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या राज्यातील सर्व केंद्रांवर प्रसारित होणार आहे. तसेच, ही मुलाखत 'छ्शुी`प –खठ' या मोबाईल ॲपवरूनही ऐकता येणार आहे. निवेदिका उन्नती जगदाळे यांनी ही मुलाखत घेतली आहे.

आरोग्य विभागामार्फत १५ जानेवारी २०२६ पासून सुरू झालेली 'अरुणोदय'सिकलसेल निमिया विशेष जनजागृती मोहीम ७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत राबविण्यात येणार आहे. या मोहिमेच्या माध्यमातून सिकलसेल निमियाचा प्रतिबंध, लवकर तपासणी आणि प्रभावी उपचार याबाबत समाजामध्ये व्यापक जनजागृती निर्माण करण्याचा शासनाचा संकल्प आहे. सिकलसेल निमिया हा एक अनुवांशिक रक्तविकार असून, त्याचा प्रादुर्भाव प्रामुख्याने आदिवासी व दुर्गम भागांमध्ये अधिक प्रमाणात आढळून येतो. विवाहपूर्व सिकलसेल तपासणीचे महत्त्व, रुग्ण व वाहकांची ओळख, गर्भावस्थेतील तपासणी, तसेच शासनामार्फत उपलब्ध असलेल्या मोफत तपासणी व उपचार सुविधांविषयी सविस्तर माहिती दिली आहे. जनजागृतीच्या माध्यमातून सिकलसेल निमियाचा प्रसार रोखणे शक्य असून, या उद्दिष्टपूर्तीसाठी समाजातील प्रत्येक घटकाने 'अरुणोदय' मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही 'दिलखुलास' कार्यक्रमातून डॉ. कंदेवाड यांनी केले आहे.

# अटल सेतूपासून थेट पुण्यापर्यंत, अडीच तासाचं अंतर ९० मिनिटांत...

### मुंबई-पुणे १३० किमीचा नवा एक्सप्रेसवे, मार्ग कुठून कसा?

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** मुंबई आणि पुणे या दोन महत्त्वाच्या महानगरांदरम्यान प्रवास करणाऱ्या लाखो नागरिकांसाठी दिलासादायक बातमी आहे. मुंबई-पुणे प्रवासाला गती देणारा, घाटातील कायमस्वरूपी वाहतूक कोंडी दूर करणारा आणि अवघ्या ९० मिनिटांत दोन्ही शहरांमधील अंतर पार करणारा नवा सुपरफास्ट एक्सप्रेसवे उभारण्यास केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी ही महत्त्वाकांक्षी घोषणा केली असून, या प्रकल्पामुळे महाराष्ट्राच्या दळणवळण नकाशावर मोठी क्रांती घडणार आहे.



सध्या अस्तित्वात असलेल्या मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरून प्रवास करण्यास साधारण अडीच ते तीन तासांचा कालावधी लागतो. मात्र सुट्टीचे दिवस, पावसाळा किंवा अपघात झाल्यास खंडाळा घाट परिसरात तासन्तास वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. अनेक वेळा हा प्रवास चार ते पाच तासांपर्यंत लांबतो. हीच समस्या लक्षात घेऊन सरकारने सध्याच्या एक्सप्रेसवेच्या समांतर एक नवा, अत्याधुनिक आणि वेगवान मार्ग विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे.

**अटल सेतू ते पुण्यातील शिवरे जंक्शनपर्यंत मार्ग :** हा नवा एक्सप्रेसवे सुमारे १३० किलोमीटर लांबीचा असून, त्याचा अंदाजित खर्च जवळपास १५ हजार कोटी रुपये आहे. हा मार्ग जेएनपीए (जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी) परिसरातील अटल सेतूजवळून सुरू होऊन थेट पुण्याजवळील शिवरे जंक्शनपर्यंत जाणार आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी पगोटे (जेएनपीएजवळ) ते पनवेलच्या चौकपर्यंतच्या मार्गाला आधीच मंजुरी मिळाली आहे.

नितीन गडकरी यांनी दिलेल्या माहितीनुसार, या सुपरफास्ट एक्सप्रेसवेवर आधुनिक अभियांत्रिकीचा वापर करण्यात येणार असून, वेगवान वाहनांसाठी सुरक्षित लेन, कमी वळणं, दर्जेदार पूल आणि आवश्यक ठिकाणी बोगद्यांचा समावेश असेल. त्यामुळे घाटातील धोकादायक वळणं, अपघातप्रवण भाग आणि सततची कोंडी टाळता येणार आहे. या मार्गामुळे मुंबई-पुणे प्रवास केवळ ९० मिनिटांत पूर्ण होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकल्पाचा आणखी एक मोठा फायदा म्हणजे राज्याबाहेरील प्रवासालाही चालना मिळणार आहे. गडकरी यांनी याबाबत माहिती देताना सांगितलं, की हा मार्ग पूर्ण झाल्यानंतर पुणे-मुंबई-बेंगळुरू हा लांब पल्ल्याचा प्रवास अवघ्या साडेपाच तासांत शक्य होईल. त्यामुळे उद्योग, व्यापार, लॉजिस्टिक्स आणि पर्यटन क्षेत्राला मोठा लाभ होणार आहे. विशेषतः आयटी, ऑटोमोबाईल, बंदरांशी संबंधित उद्योग आणि निर्यातदारांसाठी हा मार्ग अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे, नितीन गडकरी यांनाच २००२ साली सुरू झालेल्या विद्यमान मुंबई-पुणे एक्सप्रेसवेचे शिल्पकार मानलं जातं. त्या काळात हा प्रकल्प देशासाठी मैलाचा दगड ठरला होता. आता त्याच मार्गावर आणखी एक पाऊल पुढे टाकत, अधिक वेगवान आणि भविष्यातील गरजा लक्षात घेऊन नवा सुपरफास्ट एक्सप्रेसवे उभारला जात आहे. मुंबई-पुणे दरम्यानचा हा नवा एक्सप्रेसवे म्हणजे केवळ रस्ता नसून, तो राज्याच्या आर्थिक प्रगतीचा, आधुनिक दळणवळणाचा आणि प्रवाशांच्या सोयीसाठी उचललेलं एक मोठं पाऊल आहे.

## शिवसेना-भाजप कात्रीत, सत्तास्थापनेत ठाकरेंची भूमिका ठरणार निर्णायक

**आत्ताच एक्सप्रेस**

**कल्याण / प्रतिनिधी/** कल्याण डोंबिवली महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत अपेक्षेप्रमाणे शिवसेना-भाजप महायुतीला मतदारांनी घवघवीत यश मिळवून दिले आहे. एकूण १२२ जागांपैकी शिवसेनेने ५२ तर, भाजपने ५१ जागा जिंकल्या. शिवसेनेत फूट पडल्यानंतर कल्याण डोंबिवलीत शिवसेना उबाठाचे अस्तित्व नसल्याचा दावा करत महायुतीला सर्वच्या सर्व जागावर विजय मिळेल, असा विश्वास महायुतीच्या नेत्यांनी व्यक्त केला होता. पहिल्या टप्प्यात २० जागा बिनविरोध जिंकल्यानंतर हा विश्वास वाढला होता. मात्र महाविकास आघाडीतील पक्षांनी १९ जागा जिंकल्याने महायुतीमधील



दोन्ही पक्षांचे एकट्याच्या बळावर जादूई आकडा गाठण्याचे स्वप्न अपूर्ण राहिले. यामुळे आता महापौरपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

३० वर्षांपासून शिवसेनेकडे असलेले महापौरपद मिळविण्यासाठी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी कंबर कसली होती. यासाठी त्यांनी तुल्यबळ नेत्यांचा पक्षप्रवेश घडवत पक्षाची ताकद वाढविण्याचा प्रयत्न चालवला होता. मात्र दुसरीकडे शिवसेनेनेदेखील ताकद पणाला लावली होती. शिवसेनेतील मोठे नेते भाजपच्या गळाला लागल्यानंतर थेट दिल्लीत संधान साधून शिवसेनेने कल्याण डोंबिवली महापालिकेत महायुती म्हणून लढण्यासाठी भाजपवर दबाव आणला. यामुळे स्थानिक पातळीवरील नेत्यांना वाद बाजूला ठेऊन युती करावी लागली. महायुतीत जागावाटपाच्या तिढ्यावरूनही स्थानिक पदाधिकाऱ्यांनी युती तोडण्यासाठी जंगजंग पछाडले, तरीही शिवसेनेला ६७ जागा देत भाजपने ५७ जागांवर समाधान मानत निवडणूक लढवली. प्रत्यक्षात दोन्ही पक्षांकडून बंडखोरांशी समेट घडवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## सूर्यकुमार यादवचं प्रकरण न्यायालयात; अभिनेत्रीवर १०० कोटींचा मानहानी दावा

**आत्ताच एक्सप्रेस**

**कल्याण / प्रतिनिधी/** भारतीय संघाचा स्टार क्रिकेटर सूर्यकुमार यादव आणि अभिनेत्री खुशी मुखर्जी यांच्यातील वाद आता चांगलाच पेटला आहे. 'सेलेब्रिटी इमेज' विरुद्ध 'पब्लिसिटी स्टंट' अशी ही लढाई थेट कायदेशीर वळणावर पोहोचली असून, सूर्यकुमार यादवची प्रतिमा मलिन केल्याच्या आरोपावरून खुशी मुखर्जीवर १०० कोटी रुपयांचा मानहानीचा दावा दाखल झाल्याची चर्चा आहे.

मुंबईतील सोशल मीडिया इन्फ्लुएंसर फैजान अंसारी यांचा दावा आहे की, प्रसिद्धी मिळवण्यासाठी खुशी मुखर्जीने भारताच्या टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादववर बिनबुडाचे आरोप केले. टाइम्स ऑफ इंडियाच्या वृत्तानुसार, फैजान यांनी १०० कोटींची नुकसानभरपाई, तत्काळ एफआयआर आणि किमान ७ वर्षांची शिक्षा अशी मागणी केली आहे. सध्या फैजान गाझीपूर (उत्तर प्रदेश) येथे ठाण मांडून असून, ही लढाई त्यांनी क्रिकेटरच्या सन्मानासाठीची असल्याचे म्हटले आहे.

**खुशी मुखर्जीने नेमके काय म्हटले होते?**

एका कार्यक्रमादरम्यान पापाराझींशी बोलताना खुशी मुखर्जीने आपण कोणत्याही क्रिकेटरला डेट करत नसल्याचे सांगितले होते. तसेच सूर्यकुमार यादव आपल्याला सतत मेसेज करत असतो, मात्र आता त्यांच्यात कोणताही संवाद नाही आणि आपले नाव त्यांच्याशी जोडले जाऊ नये, असेही ती म्हणाली होती.

वाद चिघळल्यानंतर खुशी मुखर्जी



बॅकफुटवर गेली आहे. प्रकरण कायदेशीर स्वरूप घेताच तिने डॅमेज कंट्रोल सुरू केले. तिच्या म्हणण्यानुसार, तिचे वक्तव्य चुकीच्या पद्धतीने करण्यात आले. तिने आपले इन्स्टाग्राम अकाउंट हॅक झाल्याचा दावाही केला आहे. तसेच सूर्यकुमार यादवशी झालेली चर्चा ही केवळ मैत्रीपूर्ण होती आणि एका सामना पराभूत झाल्यानंतर सहानुभूतीपोटी संवाद झाला होता, असे तिने स्पष्ट केले आहे.

**पुढे काय घडू शकते?**

या संपूर्ण प्रकरणावर सूर्यकुमार यादव याने अद्याप कोणतेही अधिकृत वक्तव्य केलेले नाही. तो सध्या आपल्या खेळावर आणि आगामी स्पर्धांवर लक्ष केंद्रित करत आहेत. दरम्यान, १०० कोटींचा मानहानीचा दावा सिद्ध करणे फैजान अंसारींसाठी मोठे आव्हान असले, तरी या प्रकरणामुळे खुशी मुखर्जीसमोर गंभीर कायदेशीर अडचणी उभ्या राहिल्या आहेत. गाझीपूर पोलीस आता दाखल झालेल्या लेखी तक्रारीची चौकशी करत आहेत. जर एफआयआर नोंदवण्यात आली, तर खुशी मुखर्जीला चौकशीसाठी बोलावले जाऊ शकते. एक गोष्ट मात्र स्पष्ट आहे. मोठ्या व्यक्तिमत्त्वांवर बेधडक आरोप करणे कोणालाही अडचणीत आणू शकते.

## अशोक चव्हाणांनी काँग्रेसची केली एमआयएमशी तुलना

### म्हणाले, आता त्यांची जागा एमआयएमनं घेतली

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड/ प्रतिनिधी/** राज्यात एमआयएमचे १२५ नगरसेवक निवडून आले आहेत. एमआयएमने महानगरपालिका निवडणुकीत मुसंडी मारली आहे. छत्रपती संभाजी नगर शहरात या पक्षाचे सर्वाधिक ३३ नगरसेवक निवडून आले आहेत. एमआयएमची जागा काँग्रेसने घेतली, अशी खोचक टीका माजी मुख्यमंत्री व भाजपा खासदार अशोक चव्हाण यांनी केली आहे. नांदेडमध्ये एमआयएमचे १४ तर काँग्रेसचे १० नगरसेवक निवडून आले आहेत. नांदेडमध्ये ८१ जागांपैकी ४५ जागांवर भाजपाचे नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे नांदेडमध्ये अशोक चव्हाण यांनी कमळ फुलवले आहे.

## धनगर आरक्षणाचा मुद्दा ऐरणीवर; दीपक बोऱ्हाडे यांच्या मुंबईतील उपोषणास परवानगी नाकारली

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी/** धनगर समाजाचा अनुसूचित जमातींमध्ये (एस.टी.) समावेश करण्यासाठी दीपक बोऱ्हाडे यांच्या मुंबईतील आझाद मैदानावरील बेमुदत उपोषणास पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. परंतु या आंदोलनासाठी जालना जिल्ह्यातून अनेक जण मुंबईकडे रवाना होण्याची शक्यता असल्याने जिल्हा प्रशासनाने १७ जानेवारी (शनिवारी) रोजी जालना त्याचप्रमाणे अंबड या शहरांत संचारबंदी लागू करण्यात आल्याचा आदेश काढला आहे. शनिवारी सकाळी पाच ते रात्री बारा वाजण्याच्या दरम्यान हा आदेश लागू राहणार आहे.

## राष्ट्रीय स्टार्टअप दिन २०२६ : स्टार्टअप रँकिंगमध्ये 'लीडर्स' श्रेणीत महाराष्ट्राचा सन्मान

### कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे अभिनंदन

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** भारत सरकारच्या उद्योग व अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग (डीपीआयआयटी) आणि स्टार्टअप इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय स्टार्टअप दिन २०२६ निमित्त पाचव्या स्टेटस स्टार्ट अप इकोसिस्टीम रँकिंग अंतर्गत महाराष्ट्र राज्याला लीडर्स श्रेणीतील पुरस्कार प्रदान करण्यात आला. या यशाबद्दल कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीतील सर्व अधिकारी व कर्मचारी वृंदाचे अभिनंदन केले आहे.

नवी दिल्ली येथील भारत मंडपम येथे झालेल्या या राष्ट्रीय कार्यक्रमास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची प्रमुख उपस्थिती होती. स्टार्ट-अप इंडिया इनिशीएटीव्हच्या दहा वर्षांच्या वाटचालीचे औचित्य साधून आयोजित या कार्यक्रमात देशातील स्टार्टअप परिसंस्थेतील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या राज्यांचा गौरव करण्यात आला.




महाराष्ट्राच्यावतीने हा पुरस्कार महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील, व्यवस्थापक (स्टार्टअप्स व नावीन्यता) अमित कोठावदे व विवेक मोगल यांनी स्वीकारला.

स्टार्टअप धोरणाची प्रभावी अंमलबजावणी, स्टार्टअप्ससाठी सक्षम इन्क्युबेशन व ॲक्सेलरेशन सुविधा, भांडवली प्रवेश, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय भागीदारी, जिल्हास्तरापर्यंत पोहोचलेले उपक्रम तसेच सर्वसमावेशक स्टार्टअप सहभाग या निकषांवर महाराष्ट्राने सातत्यपूर्ण व परिणामकारक कामगिरी केली आहे. याच कामगिरीच्या आधारे महाराष्ट्राला लीडर्स श्रेणीत स्थान देण्यात आले.

महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या माध्यमातून राज्य शासनाने उभारलेली संस्थात्मक यंत्रणा, विविध विभागांतील समन्वय आणि स्टार्टअप परिसंस्थेतील सर्व घटकांचे योगदान यामुळे महाराष्ट्राने देशात आपले नेतृत्व कायम राखले असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

हा सन्मान महाराष्ट्रातील स्टार्टअप्स, उद्योजक, इन्क्युबेटर्स, गुंतवणूकदार, शैक्षणिक संस्था आणि धोरणकर्त्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे प्रतीक असल्याचे डॉ. श्रीकांत पाटील यांनी यावेळी नमूद केले.

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस
संपादकीय रविवार, १८ जानेवारी २०२६


# 'हिंद दी चादर' गुरु तेगबहादुर साहिब यांच्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण

'हिंद दी चादर', श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या शहिदीला ३५० वर्षे पूर्ण होत असल्याने महाराष्ट्र शासन आणि श्री गुरु तेग बहादुर साहिबजी ३५० वी शहिदी समागम राज्यस्तरीय समितीमार्फत गेल्यावर्षी ७ डिसेंबर रोजी झालेल्या देखण्या आयोजनानंतर २४ आणि २५ जानेवारी २०२६ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत नांदेड येथे भव्य अध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी स्वाभीमान आणि देश रक्षणासाठी दिलेले बलिदान अनन्य साधारण आहे. त्यांच्या परिवारातील सदस्यांनीही देशासाठी शहादत दिली. हा गौरवशाली इतिहास सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. त्याचे स्मरण करणारा आणि गुरुंनी देशासाठी दिलेल्या बलिदानावर प्रकाश टाकणारा हा लेख

काश्मीरचा सुभेदार हा शिखांचे नववे गुरु तेगबहादुर साहिब यांच्या मदतीसाठी गेले. 'ना पेह देना ! ना पेह सेना' म्हणत (घाबरायचे नाही व घाबरवयाचेही नाही) काश्मीरींच्या रक्षणासाठी गुरु तेगबहादुर साहिब यांनी थेट तत्कालीन सत्तेला आवाहन दिले व दिल्लीकडे कुच केली. आग्रा येथेच तेगबहादुरांना अटक करण्यात आली. दिल्लीला आणून त्यांना धर्मांतराची बळजबरी करण्यात आली. गुरु तेगबहादुरांनी त्यास नकार देऊन लाल किल्ल्यासमोरील चांदणीचौकात बलिदान दिले. त्यांचे हे बलिदान इतिहासात अमर झाले व भारतभूमीचे कवच म्हणून त्यांना 'हिंद दी चादर'म्हणून ओळखले जाते. सत्य व अहिंसेचे प्रेषित असलेल्या तेगबहादुरांनी बलिदान देऊन मानवी स्वातंत्र्याचा व स्वतःस पटेल तो धर्म आचरण्याचा आदर्श भारतीयांना घालून दिला.

श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या सोबत अनेक समाज उभे होते विशेषत: सिकलीगर, बंजारा, लबाना, मोह्याल, सिंधी समाजांनी या संघर्षात मोलाचे योगदान देत तेगबहादुर साहेबांनी दिलेल्या देश व मानवतेच्या रक्षणाची शिकवण सर्वदूर पोहोचवली. भाई मतीदास, भाई सतीदास आणि भाई दयाल गुरु तेग बहादुरांच्या आत्मसन्मानासाठी आणि गुरुनिष्ठेसाठी शहीद झाले. हे समाज सेवाभाव, साहस आणि श्रद्धेसाठी ओळखले जातात. दिल्लीच्या ऐतिहासिक लाल किल्ला परिसरातील चांदणी चौकात सीसगंज गुरुद्वारा सर्व भारतीयांसाठी प्रेरणास्रोत ठरला आहे.

**त्याग व शौर्याचे प्रतीक 'सीसगंज' आणि 'रकाबगंज' गुरुद्वारा**

सरदार बघेलसिंह यांनी १७८३ मध्ये दिल्ली सर करून लाल किल्ल्यावर कब्जा मिळवला आणि गुरू तेगबहादुरांच्या शहीदस्थळी सीसगंज गुरूद्वारा बांधण्यात आला. पुढे १९३० रोजी याच गुरूद्वाऱ्याचे पुनर्निर्माण करण्यात आले. स्वधर्माची ज्योत भारतीयांमध्ये तेवत ठेवण्याकरिता व प्रसंगी बलिदान देण्याचा संदेश देणारा सीसगंज गुरूद्वारा भारतीयांचे मुख्य श्रद्धास्थान ठरले आहे. दिल्लीच्या ऐतिहासिक लाल किल्ला परिसात स्थित सीसगंज गुरुद्वारा हा दिगंबर जैन अतिशय क्षेत्र लालमंदिरापासून सुरु होणाऱ्या चांदणीचौकाकडील रस्त्यावर आहे, तर संसद भवनाच्या मागील भागात रकाबगंज गुरुद्वारा स्थित आहे.

शीख धर्मियांचे मार्गदर्शक दहा गुरु आहेत. यापैकी दोन गुरु हे तेग बहादुरांचे आप्त आहेत. गुरु तेगबहादुर हे शिखांचे नववे गुरू असून सहावे शीखगुरू हरगोविंद यांचे ते सर्वात धाकटे पुत्र व शिखांचे दहावे व शेवटचे गुरू गोविंदसिंह यांचे ते पिता होत. तेगबहादुरांचा जन्म अमृतसर येथे झाला. वयाच्या ८ व्या वर्षी कर्तारपूर येथील लालचंदजी खत्री यांची कन्या गुजरी यांच्याशी तेगबहादुरांचा विवाह झाला. त्यांचे मूळ नाव त्यागमल होते. लहानपणीच त्यांना वैराग्य प्राप्त झाले. गृहस्थ असूनही ते वडिलांच्या मृत्युनंतर बकाला येथे जाऊन विरक्त वृत्तीने राहू लागले.

शिखांचे आठवे गुरू हरकिशन यांच्या निधनानंतर १६६४ मध्ये तेगबहादुर यांना नववे गुरू म्हणून गादीवर बसविण्यात आले. त्यांनी स्वतःसाठी शिवालिक पर्वतराजीत एक नगर वसविले आणि तिथे आपली गादी स्थापून ते धर्मप्रचारासाठी यात्रा करू लागले. हे नगर आनंदपूर म्हणून पुढे शिखांचे प्रसिद्ध व पवित्र क्षेत्र बनले. पाटणा येथे त्यांचे पुत्र गोविंदसिंह यांचा जन्म झाला. पुढे शिखांचे दहावे व शेवटचे गुरू गोविंदसिंह म्हणून ते उदयास आले.

**तेगबहादुर यांच्या कुटुंबातील सात सदस्यांचे बलिदान**

देशहितासाठी प्राणांचे बलिदान देणारे गुरु तेग



बहादुर यांनी मोठा आदर्श घालून दिला. त्यांचीच शिकवण पुढे घेऊन जात त्यांच्या कुटुंबीयांनीही बलिदान दिले. आनंदपूरच्या लढायांनंतर सरदार वजीर खानाने गुरू गोविंदसिंग यांच्यावर हल्ला केला. यात मोठे दोन साहिबजादे अजीतसिंग आणि जुझारसिंग यांनी सरदाराच्या सैन्यासमोर शौर्याने लढत वीरगती प्राप्त केली. छोटे साहिबजादे जोरावरसिंग आणि फतेहसिंग यांना त्यांच्या आजी माता गुजरीजींसोबत सरहिंदच्या थडग्यात कैद करण्यात आले. वजीर खानाने त्यांना थंडीच्या रात्री उघड्यावर ठेवले आणि नंतर जिवंतपणे भिंतीत बंद करून मारले. या बलिदानाचे स्मरण करण्यासाठी केंद्र शासनाने २१ ते २७ डिसेंबर हा 'बलिदान सप्ताह' आणि २६ डिसेंबर हा 'वीर बाल दिवस' म्हणून घोषित केला व देशभर तो साजरा केला जात आहे. शिखांचे दहावे व शेवटचे गुरु, गुरु गोविंद सिंग यांनी १४ युद्धे लढली. १७०८ मध्ये नांदेड येथे देश रक्षणासाठी लढताना ते शहीद झाले.

गुरु तेगबहादुरांनी आसामपासून काश्मीरपर्यंत आपल्या सद्विचारांचा प्रसार केला. त्यांनी विविध विषयांवर ११६ पद्ये रचली. ही पद्ये पुढे गुरू गोविंदसिगांनी गुरु ग्रंथसाहिबात अंतर्भूत केली. यांतील ५९ पद्ये 'शबद' (स्तोत्रे) आणि ५७ पद्ये 'श्लोक' आहेत. त्यांच्या रचनेत वैराग्य व क्षमाशील वृत्तीचा उत्कृष्ट आविष्कार आढळतो. अहिंसा व सत्याचे प्रेषित असलेल्या तेगबहादुरांनी प्राण त्याग करून मानवी स्वातंत्र्याचा व स्वतःस पटेल तो धर्म आचरण्याचा आदर्श भारतीयांना घालून दिला. त्यांच्या बलिदानाने भारतीयांमध्ये जी अस्मिता निर्माण झाली तिला इतिहासात तोड नाही. तेगबहादुर साहिब यांच्या शहिदीला ३५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने यावर्षी भारतभर मोठ्या प्रमाणात विविध कार्यक्रम आखण्यात आले आहेत.

'हिंद दी चादर'श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त राज्यभर विविध प्रबोधनपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. याअंतर्गत नागपूर येथील नारा परिसरातील सुरेश चंद्र सुरी मैदानावर ७ डिसेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्यावर भारतीय डाक विभागामार्फत विशेष टपाल तिकीट जारी करण्यात आले. सिंधी आणि पंजाबी समाजाच्या इतिहासाचे दर्शन घडविणाऱ्या ऐतिहासिक शस्त्रांचे प्रदर्शन लावण्यात आले. विदर्भ आणि छत्तीसगढ मधील शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोह्याल, वाल्मीकी आणि सिंधी समाजबांधवानी एकत्र येऊन हा ऐतिहासिक समागम कार्यक्रम साजरा केला.

**श्री हुजूर साहिब नांदेड**

शीखांचे दहावे गुरू श्री गोविंद साहिबजी यांची कर्मभूमी ही महाराष्ट्रातील श्री हुजूर साहिब नांदेड असून याठिकाणी त्यांनी सर्व शीख बांधवांना उद्देशून, 'सब सिक्खन को हुकम हे गुरू मान्यो ग्रंथ साहिब' असा उपदेश दिला होता. हा मानवतेचा संदेश घरोघरी पोचविण्यासाठी व श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या त्यागाची शिकवण समाजाच्या सर्व घटकांत पोचविण्याच्या उद्देशाने नांदेड येथे येत्या २४ व २५ जानेवारीला शहिदी समागम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

नांदेडमध्ये देहरुपी गुरु जाऊन गुरुग्रंथ साहिबची स्थापना झाली. नांदेड येथील बंदासिंग यांनी गुरु गोविंद सिंग यांच्या प्रेरणेने पंजाबात जाऊन परकियांशी लढा दिला व प्रशासक बनले. त्यांनी सरहिंद जिंकून शेतकऱ्यांना जमीन मालकीचा अधिकार दिला आणि स्वराज्याची पायाभरणी केली.

गुरू गोविंद सिंग यांनी १७०६ मध्ये 'जफरनामा' हे पत्र लिहून सत्ता प्रमुखाला नैतिकतेचे आव्हान दिले. हे पत्र फारसी भाषेत असून, त्यात सत्ताधिशांच्या विश्वासघातकी वर्तनाचा, जुलूमांचा आणि शीखांवर केलेल्या अत्याचारांचा समाचार घेतला. पत्र वाचून बादशाहने गुरूजींना सन्मानाने आणण्याचा आदेश दिला, पण गुरूजींनी ते नाकारले. हे पत्र शीख इतिहासातील विजयाचे प्रतीक मानले जाते.

मराठवाड्यातील नरसी नामदेव हे थोर वारकरी संत, संत नामदेवांचे जन्म गावही याच भागात आहे. संत नामदेवांनी वारकरी संप्रदायाच्या विस्ताराकरिता देशभ्रमण केले. पंजाबात गेले असता त्यांच्या उद्बोधनाने सर्व समाज भारावला त्यांच्या ६१ अभंगांचा शिखांच्या पवित्र गुरु ग्रंथसाहिबमध्ये अंतर्भाव करण्यात आला आहे.

श्री गुरु तेग बहादुर साहिब यांचा देशरक्षण, सहिष्णुता आणि मानवतेचा संदेश महाराष्ट्रातील घराघरांत पोहचविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासन तसेच शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोह्याल, वाल्मिकी उदासीन आणि गुरुनानक नामदेव संगत, तखत नांदेड गुरुसाहेब यांचा समावेश असलेल्या श्री गुरु तेग बहादुर साहिबजी ३५० वी शहिदी समागम राज्यस्तरीय समितीमार्फत नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी शहिदी समागम कार्यक्रमास पंजाब, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगना आणि मराठवाड्यातील शीख व अन्य समाज बांधव मोठ्या संख्येने यात सहभागी होणार आहेत. गुरु तेगबहादुरांच्या कार्याची महिती पोचविण्यासाठी प्रत्येक शाळा, महाविद्यालये, विद्यापीठांमध्ये वक्तृत्व स्पर्धा, गीते, डाक्युमेंटरी प्रदर्शीत करण्यात येत आहेत. या सर्व आयोजनातून 'हिंद दी चादर'श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचे महान विचार आणि अजोड कर्तृत्वाचा परिचय जनतेला होणार आहे.

– **रितेश मो.भुयार,** माहिती अधिकारी, माहिती व जनसंपर्क, नागपूर

# बिबट्या मारणे आहे?

'बिबट्याला मारायला हवे.' दोन व्यक्तीचं संभाषण. 'अलिकडील काळात बिबट्या जास्त दिसतोय. तो आपली मुलं नेताय, आपल्याच डोळ्यासमोरून, आपल्याच गावात शिरुन आणि आपल्या गोठ्यातील जनावरंही नेतोय. आपल्याच शेतात आपल्याला क्षती पोहोचवतोय. आपलं जगणं त्यानं कठीण करुन टाकलंय. आज आपण त्यांचा बंदोबस्त लावू शकतो. कारण त्यांची संख्या कमी आहे. उद्या त्यांची संख्या वाढल्यास तेच आपला बंदोबस्त लावतील. कारण ते मांसभक्षक प्राणी आहेत. शाकाहारी नाहीत.' दोन व्यक्तींचं संभाषण. ते खरंही होतं. कारण बिबट्यानं तिरोडा भागातील एका गावातील एका दांपत्याचा चार वर्षाचा मुलगा सकाळी थंडीमध्ये बाहेर शेकोटीजवळ हात शेकत असतांना प्रत्यक्ष आईवडीलांसमोरच उचलून नेला होता.*

बिबट्या आज लोकांना अतिशय त्रासदायक ठरलेला आहे. मागे नागपूर सारख्या शहरात दोन बिबटे शिरुन त्यांनी लोकांना त्रास दिला. त्यातच ते शहरात शिरल्यानं त्यांना पकडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न घडले. कारण ते मा. मुख्यमंत्री महोदयाच्या गावात होते. त्यातच त्यावेळेस अधिवेशनही होतं.

नागपूर शहरात शिरलेले ते बिबटे. त्यातच विद्यमान काळात होत असलेलं अधिवेशन. त्यामुळं त्याला पकडण्यासाठी झालेले नव्हे तर केले गेलेले शर्थीचे प्रयत्न. अन् बिबट्या जर शहरात धुमाकूळ माजवत असेल तर त्याला पकडणे तेवढेच गरजेचं आहे. परंतु ही झाली शहरातील गोष्ट. प्रश्न हा उद्भवतो की ग्रामीण भागाचं काय? ग्रामीण भागात तर सतत बिबट्याची भीती असते लोकांना. कारण कितीतरी बिबटे हे ग्रामीण भागात मोकळे फिरत असतात. ते उसाच्या फडात कुठेही दिसतात लोकांना आणि एक नाही तर तब्बल चार पाचच्या समुहानं दिसतात. त्यामुळं त्यांचा बंदोबस्त कसा लावायचा? हा ऐरणीचा प्रश्न लोकांसमोर उभा राहतो.

बिबट्या हा शहरात आला तर गंभीर दखल घेतली जाते आणि ग्रामीण भागात दिसला वा आढळला तर त्याची तेवढ्या प्रमाणात गंभीर दखल घेतली जात नाही. असे कितीतरी बिबटे ग्रामीण भागात सैरावैरा फिरत असतात. एक अशीच घटना. वर्तमानपत्राच्या माध्यमातून झळकलेली. गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा तालुक्याचा भाग. ज्या भागात डाकराम, सुकळीसारखे कितीतरी लहान लहान खेडे आहेत. त्या भागातील एका गावात थंडीच्या दिवसात थंडी घालविण्यासाठी बसलेल्या आईवडील व मुलांच्या टोळक्यातून त्या मुलाच्या आईवडिलांसमोरुन बिबट्यानं एका चार वर्षाच्या मुलाला उचलून नेले. ते बिबट्याचे त्या मुलाच्या आईवडिलांसमक्ष उचलून नेणं. त्यातच अशावेळेस ते आईवडील मनात इच्छा असूनही काहीच करु शकले नाही. हीच वास्तविकता घडली. ही वास्तविकता काय दर्शवते? ही वास्तविकता दर्शवते की आता गावात जंगलराज निर्माण झालेला आहे व पुर्वी जसे जंगलातून हिंस्र प्राणी कोणत्याही प्राण्यांच्या पाडसांना त्यांच्या डोळ्यासमोर उचलून नेत असत. त्यावेळेस ते प्राणीही काहीच करु शकत नसत. तेच चित्र आज ग्रामीण भागात मानवी वस्तीत दिसत आहे. त्यातच बिबट्यानं त्या इवल्याशा चार वर्षाच्या मुलाला उचलून नेलं व ही गंभीर बाब असली आणि आज चार पाच दिवस त्या घटनेला झाले असले तरी शासनानं त्या नरभक्षक बिबट्याला जेरबंद केलेले नाही वा त्याचा बंदोबस्त लावलेला नाही.

बिबट्या जसा शहरात येतो. तो लोकांना त्रास देतो. तसाच तो ग्रामीण भागातही वावरतो आणि तिथंही लोकांना त्रासच देतो. ही सत्य बाब आहे. मात्र शहरात जसा बिबट्याचा बंदोबस्त लावला जातो. तसा ग्रामीण भागात बिबट्याचा जास्त वावर असूनही त्याच्या



बंदोबस्त लावण्यावर प्रश्नचिन्हं लागतं.

ग्रामीण भागातील बिबट्याचा मनमोकळा वावर. त्यातच त्याचं आईवडिलांच्या डोळ्यासमोर लेकरांना उचलून नेणं. त्यातच गावात भीतीदायक वातावरण तयार होणं. या गोष्टी काय दर्शवतात? या गोष्टीवरुन लक्षात येतं की ग्रामीण भागातील लोकांनी घरातच लपून राहावं बिबट्याच्या भीतीनं. बिबट्या आपल्याला धोका करतोय म्हणून लोकांनी कोणत्याच गोष्टीसाठी बाहेर पडू नये. त्यांनी आपल्या स्वतःच्या लहान मुलांनाही शाळेत पाठवू नये. त्यांना शिक्षणापासून वंचीत ठेवावं. त्यांनी कोणत्याच प्रकारचे उद्योगधंदे करु नये. शेतीही पिकवू नये. एवढंच नाही तर निर्धार करुन बिबट्यांचा प्रतिकारही करु नये. कारण प्रतिकार करतांना बिबट्या मरतो. अन् बिबट्याला मारणं म्हणजे एक जीवहत्या. त्याची केस बनेल. खटला चालेल वैगेरे वैगेरे. ती केस लढायला तेवढा पैसा ग्रामीण भागातील लोकांजवळ कुठून? त्यातच शेतकरी वर्गाकडे कुठून? तो तर कर्जबाजारी होतो शेत पिकविता पिकविता. शिवाय तो शेतकरी कर्जापोटी आत्महत्याही करतो. अशा शेतकरी वर्गानं बिबट्याच्या शेतातील मुक्तपणे वावराला कंटाळून त्याची हत्या केली तर ते शुरपण नाहीच. तो खुन आहे. जाणूनबुजून होशात राहून केलेला खुन. शेतकरी बिबट्याच्या हमल्यानं मरतोय ना. मग मरु द्या. परंतु त्याला मारु नका. कारण आपल्याला वन्यप्राणी जगवायचेय. त्यांचं अस्तित्व समाप्त करायचंच नाही.

आज फक्त तिरोडा भागच नाही तर अशी घटना जो जो ऐकतो. तो हादरुन गेल्याशिवाय राहात नाही. आज शेतनापिकीचं संकट प्रत्येक शेतकऱ्यांना सतावतोय. त्यातच साप, विंचवासारखे प्राणीही शेतकऱ्यांसमोर संकट निर्माण करतात. वीज पडल्यानंही शेतकरी मरतोय. त्यातच आता आणखी एक नवीन संकट. बिबट्या दिसणं व तो नरभक्षक ठरणं. शेती कशी पिकवावी? हाच प्रश्न शेतकऱ्यांसमोर निर्माण झालाय. शेती करण्यासाठी वा मजूरी करण्यासाठी बाहेर पडलं तर बिबट्याची भीती आणि घरातच बिबट्याच्या भीतीनं राहिलं तर उपासमारीनं मरण्याची भीती. काय करावं, हेच आज ग्रामीण भागातील लोकांना सूचत नाही. सरकारही यावर ठोस उपाययोजना करीत नाही. ते कमजोर पडत आहेत. कारण त्यांना बिबट्याची झळ पोहोचत नाही. त्याचं आणखी एक कारण म्हणजे शासन जो चालवतो. त्याला ग्रामीण भागातील झोपड्यात राहावं लागत नाही. त्यांना दररोज बिबट्याशी दोन हात करुन मृत्यूचा सामना करावा लागत नाही. त्यांना आलिशान गाडीत बिबट्यापासून संरक्षण मिळवत बसता येतं. मात्र मरत आहेत ग्रामीण भागातील लोकं. त्या बिचाऱ्यांना कोणत्याच स्वरुपाचं संरक्षण नाही. ना त्यांची घरं मजबूत आहेत. ना त्यांच्या घरातील जनावरांसाठी पुरेसे संरक्षण करणारे गोठे आहेत. आज त्यांची कितीतरी जनावरे बिबट्या एका रात्रीतून उचलून नेतात. अन् आज त्यांनाच नाही तर त्यांची मुलंही उचलून नेत आहेत.

आज ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेती करतांना बिबट्या नावाची नवीनच भीती निर्माण झालेली असून शासनानं त्यांचा बंदोबस्त लावण्यासाठी ठोस उपायोजना करण्याची गरज आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना शस्त्र वापरण्याची परवानगी द्यावी. जेणेकरुन तो स्वतःचं आत्मसंरक्षण करु शकेल.

पुर्वी शेतात वन्यप्राण्यांपैकी फक्त रानडुकर, हरणं, माकडं व नीलगाई येवून त्रास द्यायचे. ते शेतातील पीक खायचे. एवढंच नाही तर उभ्या पिकांचं नुकसान करायचे. त्यासाठी शेतकरी शेतात पिकांच्या सभोवताल इलेक्ट्री करंट लावायचे. ज्यातून प्राणी मरत व खटले तयार होत. कारण ते प्राणी शाकाहारी होते व त्यांचा शेतकऱ्यांना भक्षक म्हणून त्रास नव्हता. मात्र आता तर शेतात बिबट्याही येवून त्रास देत असल्याने जी भीती शेतकरी किंवा शेतमजूरात निर्माण झाली आहे. ती भीती घालविण्यासाठी शेतकऱ्यांना आत्मसंरक्षण म्हणून बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी काहीतरी शस्त्र वापरण्याची परवानगी द्यावी. जेणेकरुन शेतकरी बिबट्यापासून आपलं संरक्षण करु शकतील. त्यातच समजा आत्मसंरक्षण करतांना एखादा बिबट मेलाच वा मारला गेलाच तर त्याचा खटला तयार होवू नये. जेणेकरुन शेतकऱ्यांना तुरुंगाच्या कठड्यात उभे राहावे लागेल व त्याचाही त्रास शेतकऱ्यांना होईल.

शेतकरी जगाचा पोशिंदा आहे. त्याला पीक पिकविण्यासाठी अभय देणं आजच्या काळाची गरज आहे. तो जर बिबट्याला घाबरुन घरातच बसून राहिला व शेती पिकवलीच नाही तर उद्या तो तर उपाशी राहून मरेलच. आपणही त्याबरोबर उपाशी राहून मरु. तसं पाहिल्यास वन्यप्राणी रक्षण करणं ही आजची गरज आहे. अन् तेही महत्वाचंच आहे. परंतु त्याचबरोबर ग्रामीण भागही त्यांच्या हल्ल्यापासून सुरक्षीत ठेवणे. ही देखील काळाची गरज आहे. बिबट्या गावात शिरला आहे हे बरोबर आहे. परंतु त्याचं नरभक्षक म्हणून गावात राहाणं हे काही बरोबर नाही. जर तो शाकाहारी असता तर ठीक बाब होती. परंतु तो मांसाहारी आहे. त्याचा बंदोबस्त लावणं गरजेचं आहे. तसाच आजचा बिबट्या हा अतिशय हुशार आहे. तो बिबट्या आता एवढा हुशार झालाय की तो पिंजऱ्यातही शिरत नाही. करंट लावून मारला तर त्याला शासनाची परवानगी नाही. वन्यजीव प्राणीसंरक्षण या कायद्याचं उल्लंघन होतंय. तेव्हा त्यांना मारु नये? हा विचार करण्याऐवजी त्यांना वेळीच संपवावं हाच विचार रास्त ठरेल. उदाहरण एखाद्या उंदराचं देता येईल. जर आपल्या घरात उंदरांची संख्या वाढलीच तर त्यांना आपण विष देवून मारतोच. कारण ते आपल्या घरच्या धान्याचं कपड्यालत्याचं नुकसान करतात. आपण कोंबडे, बकरे कापून खातोच. कारण त्यांची संख्या नियंत्रणात असावी. असं आपल्याला वाटतं. मग बिबट्या तर नरभक्षक आहे. त्याला मारलं तर काय हरकत आहे.

बिबट्या मारणं, ही गोष्ट आजच्या काळाची गरज बनलेली आहे. जर त्याला आज मारण्याची सुरुवात केली नाही तर त्यांची संख्या उद्या आपल्यापेक्षा जास्त होईल व आज ते एखाद्याला मारतात. उद्या बऱ्याच लोकांना ठार करतील यात शंका नाही. म्हणूनच जर बिबट्याचा बंदोबस्त लावायचा असेल आणि त्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवायचे असेल वा शेती करु द्यायची असेल, शेतकऱ्यांना जगवायचे असेल आणि आपणही जगायचं असेल तर बिबटे मारावेच लागेल. नाहीतर आपला विनाश नक्कीच आहे हे तेवढंच खरं.

– **अंकुश शिंगाडे,** नागपूर ९३७३३५९४५०

# सुरसम्राट कुंदनलाल सैगल

हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ गायक व पहिले सुपरस्टार कुंदनलाल सैगल यांची आज पुण्यतिथी. कुंदनलाल सैगल यांचा जन्म ११ एप्रिल १९०४ रोजी जम्मू येथे एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांचे वडील अमरचंद सैगल हे जम्मू काश्मीर संस्थानात मामलेदार होते तर आई केसरबाई या गृहिणी होत्या. त्यांच्या आईला संगीताची खूप आवड होती. धार्मिक कार्यक्रमात त्या भजन, किर्तन गात त्यामुळे लहान वयातच कुंदनलाल सैगल यांच्यावर संगीताचे संस्कार झाले. त्यांच्या आई याच त्यांच्या संगीतातील पहिल्या गुरू होत्या. कुंदनलाल सैगल यांनी संगीत कलेचे शास्त्रशुद्ध शिक्षण घेतले नव्हते पण युसुफ नावाच्या व्यक्तीकडून त्यांनी संगीताचे प्राथमिक धडे गिरवले होते. अर्थजनासाठी त्यांनी टाईपरायटर विक्रेत्याचे काम केले पण संगीतावरील प्रेमापोटी त्यांनी ते काम सोडून छोट्या मोठ्या मैफलीत गायला सुरुवात केली. त्यांच्या गायनाने प्रभावित होऊन बी. एन. सरकार यांनी त्यांना न्यू थिएटर साठी करारबद्ध केले. १९३२ साली त्यांनी चित्रपटात अभिनय करायला सुरुवात केली. पण त्यांचे पहिले तीनही चित्रपट चालले नाही. १९३३ साली आलेला पुरण भगत नावाचा चित्रपट मात्र खूप गाजला. या चित्रपटाने त्यांची गायक आणि नायक म्हणून चित्रपट सृष्टीला ओळख करून दिली. १९३५ साली आलेल्या देवदास या चित्रपटाने त्यांना सुपरस्टार बनवले. या चित्रपटात त्यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. या चित्रपटातील त्यांचा अभिनयही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला. दीदी, साथी, सूरदास, तानसेन, जीवनमृत्यू हे त्यांचे चित्रपटही खूप गाजले. १९४६ साली प्रदर्शित झालेला शारजहाँ हा चित्रपट देखील खूप गाजला. १९४७ साली आलेला परवाना हा चित्रपट त्यांच्या मृत्यूनंतर प्रदर्शित झाला. हा चित्रपट देखील यशस्वी झाला. एक बंगला बने न्यारा..., करू क्या आस निरास भाई..., सो जा राजकुमारी सो जा..., बाबुल मोरा...., जब दिल ही तूट गया... ही त्यांनी गायलेली गाणी अजरामर झाली. आजही ही गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. कुंदनलाल सैगल यांच्या गायनाचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यांच्या गायनातील उत्स्फूर्तता आणि सहजता, आर्त दर्दभरा आवाज आणि प्रत्येक गाणे भावपूर्णतेने गाण्याची वैशिष्ट्यपूर्ण शैली त्यामुळे त्यांची गाणी रसिकांच्या मनाला भिडत. कुंदनलाल सैगल यांनी भजन, किर्तन, ठुमरी, गझल, अंगाई गीत, बाल गीत, विरह गीत अशी सर्व प्रकारची गाणी गायली. हिंदी सोबतच त्यांनी उर्दु, बंगाली, तामिळ या भाषेतील चित्रपटातही भूमिका केल्या. त्यांनी ३६ चित्रपटात भूमिका केल्या तर १८५ गाणी गायली. मुकेश, मोहम्मद रफी या महान गायकांवर सुरवातीच्या काळात सैगल यांच्याच गायन शैलीचा प्रभाव होता. हे महान गायक सैगल यांनाच आपला आदर्श मानत. १८ जानेवारी १९४७ रोजी कुंदनलाल सैगल यांचे निधन झाले. कुंदनलाल सैगल यांचे निधन होऊन आज ७९ वर्ष झाली तरीही त्यांच्या गायनाची मोहिनी आजही कायम आहे. आजही त्यांची गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. कुंदनलाल सैगल हे खऱ्या अर्थाने भारताचे सुरसम्राट आहेत. आज त्यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

– **श्याम ठाणेदार,** दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५

# हिंद दी चादर – गुरु तेग बहादूर साहिबजी

भारतीय इतिहासात सत्य, करुणा आणि मानवतेसाठी प्राण अर्पण करणाऱ्या महान संत व योद्ध्यांचा समावेश आहे. अशा युगपुरुषांमध्ये शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचे स्थान अद्वितीय आहे. त्यांनी केवळ आपल्या श्रद्धेसाठी नव्हे, तर सर्व धर्मांच्या स्वातंत्र्यासाठी सर्वोच्च बलिदान दिले म्हणूनच ते 'हिंद दी चादर' – भारताची संरक्षक ढाल म्हणून ओळखले जातात.



समाजाचे स्वातंत्र्य धोक्यात आले असताना गुरु तेग बहादूर साहिबजी निर्भयपणे अन्यायाविरुद्ध उभे राहिले. त्यांनी शस्त्रापेक्षा सत्य, संयम आणि नीतिमत्ता या मूल्यांना अधिक बळ दिले. त्यांच्या उपदेशात सेवा, साधेपणा, परोपकार आणि निर्भयता यांचा सातत्याने पुरस्कार दिसतो. त्यांच्या अनेक रचना आजही गुरु ग्रंथ साहिबमध्ये आदराने समाविष्ट आहेत.

जेव्हा संपूर्ण भारतात अन्याय वाढला होता, तेव्हा गुरु तेग बहादूर साहिबजींनी स्वतः पुढाकार घेतला. त्यांनी प्रतिकार केला, पण द्वेषाने नव्हे तर आत्मबलाने. त्यामुळे त्यांना हिंद दी चादर ही उपाधी मिळाली – म्हणजेच संपूर्ण भारताला झाकणारी करुणेची ढाल. ही उपाधी केवळ शिख समाजाची नव्हे, तर समस्त भारतीयांची कृतज्ञतेची अभिव्यक्ती आहे. त्यांनी सत्य, करुणा आणि मानवतेसाठी प्राणांचे बलिदान दिले.

भै काहू को देत नहि, नहि भै मानत आन.– ना कोणाला भीती दाखवावी, ना कोणाला घाबरावे, हा गुरु तेग बहादूर साहिबजींचा संदेश आजही मार्गदर्शक आहे. आजच्या समाजात जेव्हा असहिष्णुता, द्वेष आणि ध्रुवीकरण वाढते, तेव्हा गुरु साहिबांचा जीवनसंदेश आपल्याला आठवण करून देतो की – दुसऱ्यांच्या हक्कांचे रक्षण करणे हाच खरा धर्म आहे. गुरु तेग बहादूर साहिबजींच्या ३५० व्या शहिदी वर्षानिमित्त महाराष्ट्रात नांदेड, नागपूर व नवी मुंबई येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभाग आणि विविध समाजघटकांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमांचे आयोजन होत आहे. हे केवळ स्मरण नव्हे, तर त्यांच्या विचारांचा जागर आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये टिकवणे हीच गुरु तेग बहादूर साहिबजींना खरी आदरांजली आहे.

– **हर्षवर्धन पवार,** जिल्हा माहिती अधिकारी

## संक्षिप्त

### वारकरी परंपरेच्या संगीताने रसिक न्हाले भक्तीसागरात ओडिसीनी केले मंत्रमुग्ध

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** महागामीद्वारे आयोजित अठराव्या शारंगदेव समारोहाच्या पहिल्या दिवशीच्या रंगमंचीय सादरीकरणाची सुरूवात माहागामीच्या शिष्यांद्वारे ओडिसी नृत्य प्रस्तुतीने झाली. नृत्य सादरीकरणाची सुरूवात भगवान शिवाच्या जटेतून प्रवाहित होणाऱ्या गंगा नदीवर आधारित मंगलाचरणाने झाली. त्यासाठी 'संगीत रत्नाकर' ग्रंथातील श्लोकाचे निवड केली होती. दुसरे सादरीकरण होते पल्लवी 'मुदित' ज्यामध्ये ताल आणि रागासोबत विशुद्ध नृत्य होते. राग मदमाद सारंग आणि ताल खेमटामध्ये ही पल्लवी बांधली होती. तिसरी प्रस्तुती भगवान विष्णुचे 'दशावतार' होती. त्यानंतर 'सुदेश' होती ज्यामध्ये देश अर्थात अवकाशाची बहुआयामी कल्पना साकारण्यात आली. भौतिक रुपाऐवजी आंतरिक स्फूर्तीकडे जाण्याचा प्रयत्न यात दर्शवण्यात आला. ओडिसी नृत्यांगना सांगता 'तारिणी'ने झाली. तारा बौद्ध देवतांमधील एक. ती महाकरूणा बोधिसत्व आहे. प्राणीजातीच्या द:खाचं निवारण ती करते. बौद्ध परिप्रेक्ष्य व्यापक रुपात तिचे पूजन केले जाते. आद्या शिंदे, ऐश्वर्या मुंदडा, भार्गवी मेहेकर, समृद्धी सोनटक्के, शीतल भामरे, अदिती मित्रा, दर्शना कनसे आणि वेदा कपाडिया या कलाकारांनी ओडिसी नृत्य सादर केले.त्यानंतर, वारकरी परंपरेतील संगीत अवधूत गांधी आणि सबकाऱ्यांनी केले. पंचपदी आणि नामसंकीर्तनाने सुरूवात करून त्यांनी संत ज्ञानेशवरांची रचना रूप पाहता लोचनी, तुकाराम महाराजांचा अभंग सुंदर ते ध्यान, संत नामदेव यांचे – काय सांगू देवा ज्ञानोबाची ख्याती, संत चोखामेळांचा अभंग अबीर गुलाल, एकनाथ महाराजांद्वारे रचित जागरण – अहम् वाघ्या सोहम वाघ्या, विठाई जगदंबा हा ज्ञानदेवांचा गोंधळ सादर केला. सत्वर पाव गं मला या भारूडाचे रंग भरला आणि भैरवीचे सांगता केली. त्यांना संगत केली तबला – चैतन्य पवार, पखावज – राजेंद्र महाराज बघे, हार्मोनियम व निरूपण – अभय नव्हे, संबळ सोमनाथ तरटे, टाळ व गायन – रोशन महाजन आणि हेमंत क्षीरसागर

### राजे शहाजी महाविद्यालयास अंबेलोहळ शैक्षणिक व प्रशासकीय अंकेशन (ए ए ए ) मध्ये बी ग्रेड

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी/ सुभान शहा/** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संलग्नित कृषी व ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचालित राजे शहाजी वरीष्ठ महाविद्यालय अंबेलोहळ शैक्षणिक व प्रशासकीय अंकेशन (ए ए ए) मध्ये बी ग्रेड मिळाला आहे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ.संभाजीनगर दर तीन वर्षांनी सर्व संलग्नित महाविद्यालयांचे शैक्षणिक व प्रशासकीय अंकेक्षणद्वारे महाविद्यालयाच्या कार्याचे मूल्यमापन करत आहे. शैक्षणिक वर्ष २०२५ – २६ मध्ये केलेले शैक्षणिक व प्रशासकीय अंकेशन पूर्णपणे नॅक मूल्यांकनावरआधारित होते. संलग्नित महाविद्यालयास विद्यापीठ नियुक्त समितीने भेट देऊन भौतिक सोयी सुविधांची व गुणात्मक घटकांची पाहणी करून महाविद्यालयांचे मूल्यांकन अत्यंत पारदर्शक व काटेकोरपणे केलेले आहे. या मूल्यमापनामध्ये राजे शहाजी वरिष्ठ महाविद्यालयास बी ग्रेड प्राप्त झाला आहे. महाविद्यालयाच्या या यशामध्ये संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री शिवाजी दादा बनकर पाटील संस्थेचे कार्यकारी संचालक श्री गणेश बनकर पाटील यांनी अनमोल मार्गदर्शन केले. शैक्षणिक प्रशासकीय अंकेशन समन्वयक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी केसकर यांनी काम पाहिले. महाविद्यालयाच्या यशाबद्दल परिसरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

### तंत्रज्ञान समाजाच्या भल्यासाठी वापरावे, त्याचे गुलाम होता कामा नये : सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** तंत्रज्ञान ही अपरिहार्य गोष्ट आहे. स्वदेशीचा वापर म्हणजे तंत्रज्ञान नाकारणे असे नाही. परंतु आपण तंत्रज्ञानाचे गुलाम होता कामा नये. आपण उद्योग केवळ आपल्या नफ्यासाठी नाही, समाजाच्या भल्यासाठी करतो असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले. ते युवा उद्यमी संवाद कार्यक्रमात बोलत होते.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित पूजनीय सरसंघचालकांनी समाजातील विचारवंत, कर्तव्यदक्ष व प्रभावशाली व्यक्तींसोबत थेट संवाद साधला. उपस्थितांच्या लिखित स्वरूपातील प्रश्न व शंकांचे उत्तरे त्यांनी दिली. यावेळी व्यासपीठावर प्रांत संघचालक अनिलजी भालेराव उपस्थित होते. डॉ. प्रशांत गायकवाड व पुष्कर दरगड यांनी सूत्र संचालन केले. सकाळी ११.०० वाजता समर्पण कार्यालयात हा कार्यक्रम संपन्न झाला. प्रभू मते यांनी वैयक्तिक गीत म्हटले. अभिजित धसे यांनी म्हटलेल्या कल्याण मंत्राने समारोप झाला.सरसंघचालक म्हणाले,तंत्रज्ञान वाईट नसते. पण त्याचे गुलाम आपण व्हायला नको. समाजाची गरज पूर्ण करण्यासाठी आपण काम करतो. त्यामधून आपला उदरनिर्वाह होतो. आपल्याकडचा शेतकरी अजूनही शेती करणे हा माझा धर्म आहे असे सांगतो. हा उदात्त विचार अन्य कुठे नाही. त्यामुळे आपले काम समाजाभिमुख आहे हे लक्षात घेतलं पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञान आपल्या देशातील परिस्थितीशी जुळवून घेतले पाहिजे. आपल्या तंत्रज्ञानामुळे समाजाचे नुकसान होणार नाही, रोजगार कमी होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे असे ते म्हणाले.

Date-18-01-26

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र आत्ताच एक्सप्रेस

**CHANGE IN NAME**

I Declared by This publication about change in my Name.

**OLD NAME**

shaikh Akbar kadar

**-New NAME -**

**SHAIKH AKBAR SHAIKH KADAR**

Add.-usmaniya colony, mitmita, padegaon,Chhatrapati Sambhajinagar-431001

mobile No.9096147344

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज; १८ लाख ७३ हजार मतदार बजावणार हक्क

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी /** जिल्ह्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांचा बिगुल वाजला असून, या निवडणुका पारदर्शक आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज पत्रकार परिषदेत निवडणूक कार्यक्रमाची सविस्तर घोषणा केली. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महत्त्वाचा निवडणूक कार्यक्रम:

**निवडणूक सूचना प्रसिद्धी:** १६ जानेवारी २०२६

**नामनिर्देशन पत्रे भरणे:** १६ ते २१ जानेवारी २०२६

**छाननी:** २२ जानेवारी २०२६

**अर्ज माघारी:** २३, २४ आणि २७ जानेवारी २०२६ (दुपारी ३ वाजेपर्यंत)

**चिन्ह वाटप:** २७ जानेवारी (दुपारी ३:३० नंतर)

**मतदान:** ५ फेब्रुवारी २०२६ (सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३०)

**मतमोजणी:** ७ फेब्रुवारी २०२६ (सकाळी १० वाजल्यापासून)

निवडणूक रचना आणि मतदार संख्या

जिल्ह्यात एकूण ६३ जिल्हा परिषद गट आणि १२६ पंचायत समिती गणांसाठी मतदान होणार आहे. १ जुलै २०२५ ची मतदार यादी यासाठी ग्राह्य धरण्यात आली आहे.

**एकूण मतदार:** १८ लक्ष ७३ हजार ०५३ (पुरुष: ९,७९,२३४ । महिला: ८,९३,७७८ । इतर: ४१)

**मतदान केंद्रे:** एकूण २२८२ केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. सर्वाधिक मतदान केंद्रे छत्रपती संभाजीनगर (३५४) आणि गंगापूर (३४७) तालुक्यात आहेत.

प्रशासकीय आणि पोलीस तयारी



**मनुष्यबळ:** निवडणुकीसाठी १० हजार ४८ कर्मचाऱ्यांची गरज असून, प्रशासनाकडे १२ हजार कर्मचारी उपलब्ध आहेत.

**ईव्हीएम यंत्रे:** निवडणुकीसाठी ५०२४ मतदान यंत्रे (BU) आणि २५१२ कंट्रोल युनिट (CU) वापरली जातील. ही यंत्रे नांदेडहून मागवण्यात आली आहेत.

**कायदा व सुव्यवस्था:** पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी सांगितले की, सुरक्षेसाठी १९३ अधिकारी, ३०० पोलीस कर्मचारी आणि १९३२ होमगार्ड तैनात असतील. तसेच राज्य राखीव पोलीस दलाच्या (SRPF) ३ कंपन्याही पाचारण करण्यात आल्या आहेत.

**महत्त्वाच्या अटी आणि नियम**

निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून संबंधित ग्रामीण भागात आचारसंहिता लागू झाली आहे. मात्र, नैसर्गिक आपत्ती निवारणाच्या कामांना यातून सवलत देण्यात आली आहे. २. ऑफलाईन अर्ज: उमेदवारांची मागणी लक्षात घेता, यावेळी नामनिर्देशनपत्रे ऑफलाईन (पारंपारिक) पद्धतीने स्वीकारली जाणार आहेत. ३. जात वैधता प्रमाणपत्र: राखीव जागेवरील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास, पडताळणी समितीकडे केलेल्या अर्जाची पोचपावती सादर करावी लागेल. निवडून आल्यास ६ महिन्यांच्या आत प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा निवड रद्द होऊ शकते.जिल्ह्यातील लोकशाहीचा हा उत्सव यशस्वी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

## वन्नाळीचा सुपुत्र रितेश बोळेगावे याची भारतीय नौदलात 'अग्निवीर' पदी निवड; देगलूर तालुक्यात आनंदाचे वातावरण

**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलूर (प्रतिनिधी)** जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर ग्रामीण भागातील तरुणही यशाची उत्तुंग शिखरे सर करू शकतात, हे देगलूर तालुक्यातील वन्नाळी येथील भूमिपुत्राने सिद्ध केले आहे. वन्नाळी येथील रितेश राजेश बोळेगावे याची अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या इंडियन नेव्ही (भारतीय नौदल) मध्ये 'अग्निवीर-नाविक' पदी निवड झाली आहे. या निवडीचे वृत्त गुरुवारी (१५ जानेवारी) गावात समजताच संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण पसरले असून रितेशवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

रितेशचे प्राथमिक शिक्षण देगलूर येथील पोद्दार इंग्लिश स्कूलमध्ये झाले. त्यानंतर त्याने उच्च माध्यमिक शिक्षण आणि भारतीय नौदल भरतीशी संबंधित विशेष प्रशिक्षण हैदराबाद येथे पूर्ण केले. अत्यंत कठीण शारीरिक चाचणी आणि लेखी परीक्षेच्या जोरावर त्याने 'वैयक्तिक गुणवत्ता यादीत' (Merit List) स्थान मिळवून आपले देशसेवेचे स्वप्न साकार केले आहे.



रितेश हा एका सामान्य शेतकरी कुटुंबातील तरुण आहे. त्याचे वडील राजेश बोळेगावे आणि आई सौ. रितू बोळेगावे हे शेती करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. पाच एकर शेती आणि मर्यादित संसाधने असतानाही, मुलाच्या शिक्षणात त्यांनी कोणतीही कमतरता भासू दिली नाही. आपल्या मुलाने भारतीय नौदलात स्थान मिळवल्याबद्दल पालकांचा ऊर अभिमानाने भरून आला आहे.

निवड प्रक्रियेचा निकाल जाहीर झाल्यानंतर आता रितेश आयएनएस चिल्का (ओडिशा) येथील केंद्रावर रुजू होईल. तेथील पुढील कार्यालयीन सोपस्कार पूर्ण झाल्यानंतर त्याच्या रितसर लष्करी प्रशिक्षणाला सुरुवात होणार आहे.

भारतीय नौदलातील ही निवड केवळ रितेशसाठीच नाही, तर वन्नाळी आणि परिसरातील सैन्य भरतीची तयारी करणाऱ्या इतर तरुणांसाठी मोठी प्रेरणा ठरली आहे. रितेशच्या या यशाबद्दल गावातील प्रतिष्ठित नागरिक, नातेवाईक, मित्रपरिवार आणि आजी-माजी लोकप्रतिनिधींनी त्याचे कौतुक केले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## जालन्यात ईव्हीएम घोटाळ्याचा आरोप; नियोजनबद्ध पद्धतीने फेरफार?

आत्ताच एक्सप्रेस

जालना/प्रतिनिधी/जालना महानगरपालिका निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर शहरात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या निकालांनी केवळ सर्वसामान्य नागरिकच नव्हे तर राजकीय विश्लेषकांनाही बुचकळ्यात टाकले आहे. हे निकाल म्हणजे जनमताचा कौल नसून, ईव्हीएम (EVM²) मशीनमध्ये नियोजनबद्ध पद्धतीने केलेली फेरफार आणि 'व्होट बॅलन्सिंग'चा प्रकार आहे, असा गंभीर आरोप डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे जिल्हाध्यक्ष शेषराव जाधव यांनी केला आहे.शेषराव जाधव यांनी पत्रकारांशी बोलताना भाजपच्या यशावर थेट निशाणा साधला. ते म्हणाले की, जालना शहरात भारतीय जनता पक्षाच्या बाजूने कोणत्याही प्रकारचे सकारात्मक किंवा पोषक वातावरण नव्हते. असे असतानाही भाजपने तब्बल ४१ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवणे हे अनाकलनीय आहे. हे निकाल स्थानिक मतदारांच्या भावनेशी पूर्णपणे विसंगत आहेत. केवळ जालनाच नव्हे, तर राज्यातील इतर महापालिका आणि मागील लोकसभा-विधानसभा निवडणुकांमध्येही अशाच प्रकारे मशीनमध्ये लबाडी झाल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला.या निकालांचा धक्का केवळ विरोधकांनाच बसला नाही, तर महायुतीमधील घटक पक्षांनाही बसला असल्याचे जाधव यांनी नमूद केले.

## केवळ परीक्षा सुधारणा नव्हे, तर 'नितीमान नागरिक' घडवण्याची चळवळ - जिल्हाधिकारी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/**परीक्षेत कॉपी करणे ही केवळ एक शैक्षणिक चूक नसून ती एक अनैतिक बाब आहे. कॉपीमुक्त अभियान राबवणे म्हणजे फक्त परीक्षा पद्धतीत सुधारणा करणे नसून, देशाचे भविष्य असणारे नितीमान नागरिक घडवण्याचे हे एक महत्त्वाचे अभियान आहे. त्यामुळे हे अभियान यशस्वी करण्याची जबाबदारी केवळ शिक्षण विभागाची नसून, ती सर्व संबंधित प्रशासकीय विभागांची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेच्या अनुषंगाने आयोजित 'कॉपीमुक्त अभियान' प्रभावीपणे राबवण्यासाठी आज संत एकनाथ रंगमंदिरात जिल्ह्यातील मुख्याध्यापक आणि शिक्षकांची विशेष सभा पार पडली. यावेळी व्यासपीठावर खालील मान्यवर उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,डॉ. विनयकुमार राठोड: पोलीस अधीक्षक.श्रीमती प्रियाराणी पाटील: सचिव, विभागीय परीक्षा मंडळ,दीपक कोकतरे: सहसचिव, शिक्षण विभागाचे अधिकारी: जयश्री चव्हाण (प्राथमिक), आश्विनी लाठकर (माध्यमिक), अरुण शिंदे (योजना), सीमा मेहेत्रे, दीपाली थावरे, गीता तांदळे आणि सर्व गटशिक्षणाधिकारी जिल्हाधिकारी स्वामी यांनी शिक्षकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांनी वर्षभरात घेतलेल्या ज्ञानाची उजळणी असते. त्यात



गैरमार्गाचा अवलंब करणे विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी घातक आहे.केवळ कायद्याचा धाक दाखवून कॉपी थांबवता येणार नाही, तर विद्यार्थ्यांचे मन परिवर्तन करणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांना गैरमार्गापासून परावृत्त करण्यासाठी शिक्षकांनी त्यांचे प्रबोधन करावे आणि 'सुसंस्कारित विद्यार्थी' घडवण्याचे आपले कर्तव्य पार पाडावे.कॉपीसारख्या अपप्रवृत्तींना मुळापासून उपटून टाकण्यासाठी शाळांमध्ये 'दशसूत्री' सारखे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवावेत, जेणेकरून विद्यार्थी स्वत:हून प्रामाणिकपणे परीक्षा देतील.

पोलीस प्रशासन आणि जिल्हा प्रशासन परीक्षा काळात सतर्क राहणार असून, गैरप्रकार करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल. मात्र, कारवाईची वेळच येऊ नये अशा पद्धतीने संस्कारांवर भर देण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि उपस्थितांचे आभार जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती आश्विनी लाठकर यांनी मानले. या सभेला जिल्ह्यातील मोठ्या संख्येने मुख्याध्यापक आणि शिक्षक उपस्थित होते, ज्यांनी कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्याची शपथ घेतली.

## गंगापूर महावितरण कंपनीचा भोंगळा कारभार चव्हाट्यावर?

### अनधिकृत वीज कनेक्शन जोमात

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी/ सुभान शहा/** गंगापूर शहरामध्ये अनधिकृत वीज कनेक्शन जोमा तर महावितरण कंपनीचे अधिकारी कोमात चर्चेला उधाण. गंगापूर शहरांमध्ये अनधिकृत वीज कनेक्शन जोडणी असल्यामुळे इतर वीज ग्राहकांना त्याचा फटका बसत आहे. शहरांमध्ये अनधिकृत वीज कनेक्शन कोणत्या अधिकाऱ्याच्या आशीर्वादाने चालते असा प्रश्न अधिकृत वीज ग्राहकांनी उपस्थित केला आहे. महावितरण कंपनीचे अधिकाऱ्यांना अनधिकृत वीज कनेक्शन जोडणीवर कारवाई करण्याचे वावडे आहे का? सर्व सामान्य नागरिकांना शहरांमध्ये अनधिकृत वीज कनेक्शन जोडणी दिसून येत आहे. परंतु महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना दिसत नाही का? असा प्रश्न शहरातील नागरिकांनी उपस्थित केला आहे. गंगापूर शहरांमध्ये अनधिकृत वीज कनेक्शन जोडणी काही लाईन मेन यांचे व अनधिकृतपणे वीज जोडणी धारकांचे आर्थिक संबंध असल्यामुळे अनधिकृत कनेक्शन जोमात सुरू असल्याची चर्चा आहे. या प्रकरणाकडे महावितरण कंपनीचे अधिकारी लक्ष घालणार का? अनधिकृत वीज कनेक्शन धारकांवर कारवाई करण्यात येणार का? अधिकृत वीज कनेक्शन ग्राहकांना अव्वाच्या संव्वादराने लाईट बिल येत असल्याची चर्चा आहे. परंतु अनधिकृत वीज कनेक्शन धारकांना कोणत्या अधिकाऱ्याचे अभय आहे. यामुळे शहरांमध्ये अनधिकृत वीज कनेक्शन जोमात सुरू आहे. महावितरण कंपनीचे अधिकारी अनधिकृत वीज कनेक्शन धारकांवर कारवाई कधी करणार याकडे सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# श्री गुरु तेग बहादूर साहिबजींच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी निमित्त 'हिंद दी चादर' कार्यक्रमाचा भव्य आयोजन

### विभागीय आयुक्तांकडून तयारीचा सविस्तर आढावा

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** भारतीय इतिहासात अतुलनीय त्याग आणि बलिदानाचे प्रतीक असलेले नववे शीख गुरु, श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षाचे औचित्य साधून राज्यभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित 'हिंद दी चादर' या विशेष कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा सविस्तर आढावा विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज घेतला. हा सोहळा ऐतिहासिक आणि प्रेरणादायी असून, त्याच्या आयोजनात कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी प्रशासनाने सूक्ष्म नियोजन आणि परस्पर समन्वयाने काम करावे, असे कडक निर्देश त्यांनी यावेळी दिले.

**प्रशासकीय यंत्रणेची व्यापक बैठक :** विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित या महत्त्वपूर्ण बैठकीला नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दूरदृष्यप्रणालीद्वारे (Video Conferencing) सहभाग नोंदवला. तर आयुक्त कार्यालयात अपर आयुक्त मंजुषा मिसकर, नगर प्रशासन विभागाचे उपायुक्त देविदास टेकाळे यांच्यासह महसूल, शिक्षण, आरोग्य, माहिती व जनसंपर्क, पोलीस आणि अन्य संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित होते.

**नियोजनाचे प्रमुख मुद्दे आणि चर्चा :** बैठकीदरम्यान कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी खालील मुख्य विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली: जनजागृती आणि सहभाग: गुरुजींच्या त्याग आणि शौर्याचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी संपूर्ण विभागात प्रभात फेऱ्या, व्याख्याने आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे.

**युवाशक्तीचा सहभाग:** शालेय विद्यार्थी आणि महाविद्यालयीन युवकांना या ऐतिहासिक वारशाची माहिती व्हावी, यासाठी विशेष स्पर्धा व उपक्रम राबवणे.

**पायाभूत सुविधा:** मुख्य सोहळ्याच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, स्वच्छता, फिरती शौचालये आणि आरोग्य पथकांची तैनात करणे.

**सुरक्षा व वाहतूक:** मोठ्या प्रमाणात जनसमुदाय जमण्याची शक्यता असल्याने कायदा-सुव्यवस्था राखणे आणि वाहतुकीचे चोख नियोजन करण्याबाबत पोलीस प्रशासनाला सूचना देण्यात आल्या.

**'हिंद दी चादर' – सामाजिक ऐक्याचे प्रतीक :** विभागीय आयुक्त श्री. पापळकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांनी धर्माच्या रक्षणासाठी आणि मानवी मूल्यांसाठी दिलेले बलिदान हे जगासाठी दीपस्तंभ आहे. 'हिंद दी चादर' या कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक ऐक्य, सद्भावना आणि ऐतिहासिक मूल्यांची जाणीव नव्या पिढीमध्ये निर्माण होईल. हा सोहळा केवळ एक कार्यक्रम नसून तो श्रद्धा आणि आदराचा विषय आहे, त्यामुळे सर्व यंत्रणांनी तो उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडावा.

नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी नांदेड जिल्ह्यात करण्यात येत असलेल्या तयारीचा अहवाल सादर केला. गुरुद्वारा बोर्ड आणि स्थानिक प्रशासन यांच्या समन्वयातून भाविकांच्या सोयीसाठी करण्यात येत असलेल्या कामांची त्यांनी माहिती दिली.

**प्रचारावर भर देण्याचे निर्देश :** प्रत्येक विभागाने आपापल्या स्तरावर या शताब्दी वर्षाचा प्रचार आणि प्रसार करावा. माहिती व जनसंपर्क विभागाने विशेष प्रसिद्धी मोहीम राबवावी, जेणेकरून जास्तीत जास्त नागरिकांना या सोहळ्यात सहभागी होता येईल, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले.

या बैठकीला विभागातील सर्व जिल्हा प्रशासनाचे प्रतिनिधी आणि विविध शासकीय विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त

### जालन्यात अखिल भारतीय मराठी पत्रकार संघातर्फे 'दर्पण दिन' साजरा




**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केलेल्या 'दर्पण' पत्राच्या स्मरणार्थ, अखिल भारतीय मराठी पत्रकार संघातर्फे १० जानेवारी रोजी दर्पण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाराष्ट्र प्रदेश संघटक विकासकुमार बागडी यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार बाबुराव व्यवहारे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते तुलजेसभैय्या चौधरी उपस्थित होते. यावेळी चौधरी यांनी जांभेकरांच्या कार्याचा गौरव करत, पत्रकारितेने अन्यायी प्रवृत्तीवर प्रहार करून वास्तवाचे चित्रण करावे, असे आवाहन केले.व्यासपीठावर विनायक दहातोंडे, विलास खानापुरे यांच्यासह जिल्ह्यातील अनेक मान्यवर पत्रकार व संपादक उपस्थित होते. आशिष रसाळ यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुयोग खर्डेकर व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# अंबडमध्ये संचारबंदीचा 'कडक' अंमल; आरक्षणाच्या आंदोलनामुळे जनजीवन विस्कळीत

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड (प्रतिनिधी)** धनगर समाजाला 'एस.टी.' प्रवर्गातून आरक्षण मिळावे या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, खबरदारीचा उपाय म्हणून जालना जिल्हा प्रशासनाने अंबड शहरात कलम १६३ अन्वये संचारबंदी लागू केली आहे. आज पहाटे ५ वाजल्यापासून लागू करण्यात आलेल्या या निर्बंधांमुळे संपूर्ण शहरात शुकशुकाट पसरला असून, दैनंदिन जनजीवन पूर्णतः ठप्प झाले आहे.जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ (१) व (२) नुसार हे आदेश जारी केले आहेत. १७ जानेवारी रोजी रात्री १२ वाजेपर्यंत ही संचारबंदी लागू राहणार आहे. आंदोलक मोठ्या संख्येने एकत्र आल्यास कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो, ही शक्यता गृहीत धरून प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे.

आंदोलनाची पार्श्वभूमी

धनगर आरक्षणाचे आंदोलक श्री. दिपक भीमराव बोऱ्हाडे हे आज जालना येथून मुंबईतील आझाद मैदानाकडे उपोषणासाठी कूच करणार होते. मात्र, मुंबई पोलिसांनी या उपोषणास परवानगी नाकारली आहे. तसेच, काही जिल्ह्यांत जिल्हा परिषद निवडणुकांची आचारसंहिता लागू असल्याने परिस्थिती अधिक संवेदनशील बनली आहे. या सर्व




घडामोडींमुळे खबरदारी म्हणून अंबडमध्ये कडेकोट बंद पाळण्यात येत आहे.

शहरातील सद्यस्थिती

**बाजारपेठः** शहरातील मुख्य बाजारपेठ, कापड गल्ली आणि व्यापारी संकुले पूर्णपणे बंद आहेत.,**शिक्षणः** खबरदारीचा उपाय म्हणून शाळा आणि महाविद्यालयांना सुटी जाहीर करण्यात आली आहे.,**वाहतूकः** रस्त्यांवर शुकशुकाट असून केवळ अत्यावश्यक सेवांची वाहनेच धावताना दिसत आहेत.अत्यावश्यक सेवाः औषधालये, दवाखाने आणि दूध पुरवठा यांसारख्या सेवांना संचारबंदीतून सूट देण्यात आली आहे.

परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शहराच्या प्रमुख चौकांमध्ये आणि संवेदनशील भागात मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.

उपविभागीय अधिकारी (अंबड) यांच्याकडे अंबड व घनसावंगी तालुक्याची विशेष जबाबदारी सोपवण्यात आली असून, विशेष कार्यकारी दंडाधिकारी परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.संचारबंदीच्या काळात नागरिकांनी घराबाहेर पडू नये. शस्त्रे, ज्वलनशील पदार्थ किंवा स्फोटके बाळगण्यास सक्त मनाई आहे. अफवांवर विश्वास ठेवू नका आणि प्रशासनाला सहकार्य करा.सध्या शहरात शांतता असून नागरिक प्रशासकीय सूचनांचे पालन करताना दिसत आहेत. आंदोलनाच्या पुढील दिशेकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### धनगर पिंपरीच्या जिल्हा परिषद शाळेत 'आनंद नगरी'चा उत्साह

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व्यवहाराचे धडे मिळावेत आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळावा, या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धनगर पिंपरी येथे नुकताच 'आनंद नगरी' (खाद्यजत्रा) हा उपक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. या उपक्रमाच्या माध्यमातून चिमुकल्या विद्यार्थ्यांनी मांडलेल्या बाजारहाटात व्यवहार ज्ञानासोबतच आनंदाची मोठी उधळण पाहायला मिळाली.

या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे उद्घाटन शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. जिजाबाई नरोडे आणि उपाध्यक्ष श्री. किरण काळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना अध्यक्षा नरोडे म्हणाल्या की, शालेय वयातच अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. भविष्यात व्यवहार करताना लागणारे कौशल्य त्यांना या माध्यमातून बालवयातच आत्मसात करता येते, हे कौतुकास्पद आहे. चटपटीत पदार्थांची मेजवानी आणि व्यापारी कौशल्य शाळेच्या मैदानावर विद्यार्थ्यांनी विविध आकर्षक स्टॉल्स उभारले होते.



**खाद्यपदार्थ :** चटपटीत भेळ, रगडा, गरमागरम कचोरी आणि वाफाळलेला चहा.**घरगुती चवः** विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पकतेने तयार केलेले विविध चविष्ट खाद्यपदार्थ.विशेष आकर्षण म्हणजे, हे छोटे विद्यार्थी स्वतः ग्राहकांशी संवाद साधत होते, आपल्या वस्तूंचे मार्केटिंग करत होते आणि पैशांचा हिशोबही अत्यंत चोख ठेवत होते. चिमुकल्यांचे हे 'व्यापारी' रूप आणि आत्मविश्वास पाहून उपस्थित नागरिक थक्क झाले.

पालक आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

या महोत्सवाला धनगर पिंपरी गावातील नागरिकांनी आणि पालकांनी मोठी गर्दी केली होती. विद्यार्थ्यांनी बनवलेल्या पदार्थांचा आस्वाद घेत त्यांनी मुलांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. मुलांनी लावलेले स्टॉल आणि त्यांचे नियोजन पाहून खूप आनंद झाला. पुस्तकी ज्ञानासोबतच जीवन जगण्याचे कौशल्य शिकवणारा हा उपक्रम खरोखरच स्तुत्य आहे, अशी भावना एका पालकाने व्यक्त केली.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंदानी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाला जाधव , आवारे, हुसे, देशपांडे, श्रीमती ढवणे मॅडम, श्रीमती देशपांडे मॅडम, श्रीमती सुरकुटवार मॅडम यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक कैलास (पाटील) जाधव, गोविंद सावंत, शिवाजी नरोडे, विजय वरे, योगेश कचरे, प्रदीप इंगळे, प्रल्हाद काळे, बाबासाहेब सावंत, गणेश सावंत आणि ज्ञानेश्वर साळुंके उपस्थित होते.या उपक्रमामुळे संपूर्ण गावात उत्साहाचे वातावरण होते आणि विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# जालना शहरात 'कडकडीत' संचारबंदी; जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने जनजीवन ठप्प!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/**जालना जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज सकाळी ५ वाजेपासून पुढील २४ तासांसाठी अत्यंत कडक संचारबंदी (उींषशु) लागू केली आहे. या आदेशामुळे संपूर्ण जालना शहरासह जिल्हाभरातील व्यापार, शिक्षण आणि दळणवळण पूर्णपणे थांबले असून प्रशासनाने कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे.

**शहरातील प्रमुख बाजारपेठांमध्ये शुकशुकाट**

जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाची अंमलबजावणी आज पहाटेपासूनच अत्यंत कठोरपणे होताना दिसत आहे. शहरातील गजबजलेले भाग आज पूर्णपणे शांत आहेत. जुना जालना परिसरः जुना जालना भागातील सरस्वती भुवन समोरील (फोटो क्र. १७३) रस्ते आज निर्मनुष्य झाले आहेत. नेहमी गजबजणाऱ्या या भागात आज केवळ पोलिसांच्या गाड्यांचा आवाज येत आहे.

व्यापारी संकुले बंदः शहरातील मुख्य आर्थिक केंद्र असलेले अंबिका मार्केट (फोटो क्र. १७४) आणि जिंदल मार्केट (फोटो क्र. १७८, १८१, १८२, १८६) पूर्णपणे बंद ठेवण्यात आले आहेत. व्यापाऱ्यांनी प्रशासनाला सहकार्य करत आपली दुकाने बंद ठेवली आहेत.दवा आणि मोंढा बाजारः




औषधांची मोठी उलाढाल असणारे दवा मार्केट (फोटो क्र. १९१) आणि शेतकऱ्यांची वर्दळ असणारा जुना मोंढा भाग (फोटो क्र. १९२) आज कडीकुलुपात आहे.

**शाळा, महाविद्यालये आणि हॉटेल्सना कुलूप**

जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट आदेश दिल्याने आज जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये आणि कोचिंग क्लासेस बंद ठेवण्यात आले आहेत. तसेच, हॉटेल व्यावसायिकांनाही सेवा बंद ठेवण्याच्या सूचना दिल्याने बाहेरून येणाऱ्या प्रवाशांचे हाल होत असले तरी, सुरक्षिततेच्या दृष्टीने हे पाऊल उचलणे गरजेचे असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे.

**प्रशासनाचा इशाराः उल्लंघन केल्यास कठोर कारवाई!**

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी नागरिकांना घरातच राहण्याचे आवाहन केले आहे. विनाकारण रस्त्यावर फिरणाऱ्यांवर आणि आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असा सज्जड दम प्रशासनाने दिला आहे. शहराच्या प्रत्येक कोपऱ्यात पोलीस तैनात असून ड्रोनद्वारे परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे.नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि प्रशासनाला सहकार्य करावे. अत्यावश्यक सेवा वगळता इतर सर्व व्यवहार २४ तासांसाठी पूर्णपणे बंद राहतील.

## खाकीचा दणका!

### ७३ लाखांच्या सुपारीवर डल्ला मारणाऱ्या मालकाच्या मुसक्या आवळल्या

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण (हारुन शेख)** कर्नाटकातील मंगळुरू येथून गुजरातकडे निघालेली तब्बल १ कोटी रुपयांची सुपारी परस्पर लंपास करणाऱ्या एका 'लुटारू' ट्रक मालकाला पैठण एमआयडीसी पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेने फिल्मी स्टाईलने बेड्या ठोकल्या आहेत. अवघ्या २५ तासांत पोलिसांनी या गुन्ह्याचा छडा लावत ७३ लाख ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला असून, या कारवाईमुळे गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत.

**पैठण पोलिसांची २५ तासांत धडाकेबाज कारवाई**

**असा रचला होता कटः चालकाला पाजली दारू!**

मंगळुरू येथील 'साऊथ इंडियन ट्रान्सपोर्ट एजन्सी'कडून ट्रक (क्रमांक ऋग-१०-न-५०२९) द्वारे २५ टन सुपारी गुजरातच्या एका व्यापाऱ्याकडे पाठवण्यात आली होती. मात्र, ट्रकचा मालक दिनेश जेठभाई सोलंकी (रा. पोरबंदर, गुजरात) याच्या मनात मिठाचा खडा पडला.

बीडमधील मांजरसुंबा घाटात एका ढाब्यावर त्याने ट्रक चालक मोहंमद सुमरा याला जाणीवपूर्वक अतिप्रमाणात दारू पाजली. चालक बेशुद्ध पडल्याचे पाहून मालकाने स्वतः ट्रकचा ताबा घेतला. पाचोड, दावरवाडीमार्गे ढोरकीन येथील एका पेट्रोल पंपावर ट्रक नेऊन, इतर वाहनांच्या मदतीने त्यातील ३२० सुपारीच्या गोण्या गायब केल्या आणि स्वतः फरार झाला.सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपासाने फुटले बिंग चालक शुद्धीवर आल्यावर त्याला प्रकार लक्षात आला. त्याने मालकाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, पण मोबाईल बंद होता. अखेर ट्रान्सपोर्ट एजन्सीच्या मॅनेजरने पैठण एमआयडीसी पोलिसात धाव घेतली.

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. स्थानिक गुन्हे शाखा आणि एमआयडीसी पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक माहिती तपासली




असता, हा सर्व बनाव ट्रक मालक दिनेश सोलंकी यानेच केल्याचे उघड झाले.

**गुजरातपर्यंत पाठलाग करून माल हस्तगत**

पोलिसांनी आरोपीचा माग काढत थेट गुजरात गाठले. तेथे विक्री करण्यात आलेल्या मालापैकी ७३ लाख ५३ हजार ९८६ रुपयांची सुपारी जप्त करण्यात पोलिसांना यश आले.या पथकाने केली कामगिरीः सपोनि ईश्वर जगदाळे, सपोनि मुसुळे, उपनिरीक्षक संभाजी खाडे, दशरथ बुरुकुल आणि त्यांच्या पथकाने ही धाडसी कारवाई केली.गुन्हेगार कितीही हुशार असला तरी कायद्याच्या हातातून सुटू शकत नाही, हे पैठण पोलिसांनी अवघ्या २५ तासांत दाखवून दिले आहे.

# परतूरच्या विकासाला युद्धपातळीवर प्राधान्य - आमदार बबनराव लोणीकर

**आत्ताच एक्सप्रेस**


**परतूर /प्रतिनिधी/** नगरपरिषद म्हणजे राजकीय कुस्तीचा आखाडा नसून विकासाची युद्धभूमी आहे. येथे आता केवळ विकासच चालेल, अशा ठाम आणि आक्रमक शब्दांत आमदार बबनराव लोणीकर यांनी परतूर शहराच्या विकासाचा नवा संकल्प जाहीर केला. नवनिर्वाचित नगराध्यक्ष सौ. प्रियंका शहाजी राक्षे आणि उपनगराध्यक्ष सौ. विशाखा विजय राखे यांच्या पदग्रहण समारंभाप्रसंगी ते बोलत होते.

**लोणीकरांचे 'ते' भाकीत ठरले खरे**

आमदार लोणीकर यांनी नगरपरिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या भूमिपूजन प्रसंगी एक भाकीत केले होते की, या नवीन इमारतीत भाजपाचा नगराध्यक्ष बसेल. आज प्रियंका राक्षे यांच्या निवडीने हे भाकीत तंतोतंत खरे ठरले आहे. ६ कोटी रुपये खर्चून बांधण्यात येत असलेल्या या भव्य इमारतीत बसणाऱ्या त्या पहिल्या भाजपा नगराध्यक्षा ठरतील. माझ्या जिभेवर तीळ आहे, मी जे बोलतो ते सत्य होते, अशी आठवणही यावेळी त्यांनी करून दिली.

**राजकीय समीकरणे आणि विकासाची युती**

शहराच्या सर्वांगीण विकासासाठी परतूरमध्ये भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) आणि काँग्रेस यांची विशेष युती करण्यात आली आहे. ही युती केवळ सत्तेसाठी नसून शहराचा



कायापालट करण्यासाठी असून ती पुढील पाच वर्षे अभेद्य राहील, असा विश्वास लोणीकरांनी व्यक्त केला. विकासाच्या कामात आडकाठी आणणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा थेट इशाराही त्यांनी यावेळी दिला.

**'स्वच्छता सेवा पंधरवाडा' आणि नागरी सुविधा**

पदग्रहण होताच शहरासाठी महत्त्वाचे निर्णय जाहीर करण्यात आले:

**स्वच्छता मोहीमः** प्रभाग १ ते ११ पर्यंत विशेष स्वच्छता पंधरवाडा राबवून शहर चकाचक केले जाणार.

**कर्मचारी हितः** गेल्या १० महिन्यांपासून रखडलेला कर्मचाऱ्यांचा पगार मार्गी लावण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा केला जाईल. कार्यक्रमात कर्मचारी प्रथमच शिस्तबद्ध गणवेशात दिसले.

**पायाभूत सुविधाः** बंद असलेल्या घंटागाड्या पुन्हा सुरू करून ३ नवीन घंटागाड्या उपलब्ध केल्या जातील. तसेच सार्वजनिक शौचालयांसाठी मोठा निधी दिला जाईल.

स्वीकृत नगरसेवक पदाच्या निवडीत रंगत पाहायला मिळाली. संदीप बाहेकर आणि विनायकराव काळे यांची निवड ईश्वर चिठ्ठीद्वारे (लॉटरी) झाली. यावर बोलताना भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर म्हणाले की, जनतेचा आशीर्वाद तर होताच, पण ईश्वर चिठ्ठीने हे सिद्ध झाले की ईश्वराचा आशीर्वादही आमच्याच पाठीशी आहे. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपिल आकात यांनीही शहरहितासाठी कठोर निर्णय घेणार असल्याचे सांगितले.या सोहळ्याला शत्रुघ्न कणसे, संपत टकले, रमेश भापकर, नितीन राठोड, गटनेते प्रकाश चव्हाण, मुख्याधिकारी, आणि सर्व नवनिर्वाचित नगरसेवक-नगरसेविकांसह मोठ्या संख्येने नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पाचोड येथील शिवछत्रपती महाविद्यालयात छत्रपती संभाजी महाराज राज्याभिषेक दिन उत्साहात संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी.गणेश सपकाळ/** पाचोडः छत्रपती संभाजी महाराज यांचा राज्याभिषेक दिन हा केवळ इतिहासातील एक दिनांक नसून, तो धैर्य, अफाट ज्ञान, राष्ट्रनिष्ठा आणि बलिदानाचा एक तेजस्वी संकल्प आहे, असे गौरवपूर्ण उद्गार प्रा. नितीन चित्ते यांनी काढले. पाचोड येथील शिवछत्रपती महाविद्यालयात स्वराज्यरक्षक, बुधभूषणकार छत्रपती संभाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

१६ जानेवारी १६८१ रोजी किल्ले रायगडावर छत्रपती संभाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला होता. या ऐतिहासिक घटनेचे स्मरण करण्यासाठी महाविद्यालयात भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**मान्यवरांच्या हस्ते अभिवादन :** कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वराज्यसंस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण




करून अभिवादन केल्यानंतर, व्यासपीठावरील पाहुण्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

**राजसत्ता ही जनसेवेसाठी: प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे :** कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी आपल्या भाषणात महाराजांच्या पराक्रमावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षी छत्रपती मुकुट धारण केलेल्या संभाजी महाराजांनी स्वराज्याची धुरा सांभाळताना राजसत्ता ही उपभोगासाठी नसून, जनतेच्या रक्षणासाठी आणि न्याय व स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठीची पवित्र जबाबदारी मानली. आपल्या कारकिर्दीत एकूण १२१ किल्ले जिंकणारे संभाजी राजे यांचे जीवन म्हणजे अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची आणि सत्यासाठी अखेरपर्यंत लढण्याची मोठी प्रेरणा आहे.

**उपस्थित मान्यवर :** या प्रसंगी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. भाऊसाहेब आंधळे आणि प्राचार्य डॉ. बी.डी.मुंडे यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संतोष चव्हान यांनी केले, तर सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. शिवाजी यादव यांनी प्रभावीपणे पार पाडले. शेवटी उपस्थितांचे आभार डॉ. गांधी बानायत यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील डॉ. उत्तम जाधव, डॉ. हरिप्रसाद बिडवे, डॉ. सुरेश नलावडे, डॉ. तुकाराम गावंडे, डॉ. विठ्ठल देखने, प्रा. सचिन कदम, प्रा. संदीप सातोणकर यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अँण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813